# पुढारी

# महाराष्ट्र राज्य वखार महामंडळ

(महाराष्ट्र शासनाचा सार्वजनिक उपक्रम)

एम.ए.आय.डी.सी. इमारत, ताराराणी चौक, कावळा नाका, कोल्हापूर - ४१६००१

दूरध्वनी क्र. ०२३१- २५२८८७७ | E-Mail - Kolhapur.ro@mswc.in

## गोदाम भाड्याने देणेबाबत

महाराष्ट्र राज्य वखार महामंडळाची खालील नमूद गोदामे AS IS WHERE IS पध्दतीने लॉक ॲण्ड की भाडे तत्वावर भाडे दरात प्रती वर्षी किमान ५% दरवाढीने दोन वर्ष कालावधीकरीता (१+१) व अधिक कालावधीकरीता देण्याचे नियोजन आहे. त्यासाठी औद्योगिक कंपन्या/संस्था, व्यापारी, सहकारी संस्था, कारखाने, खत कंपन्या, शेतमाल उत्पादक संस्था इ. यांना द्यावयाचे आहे. तरी आर्थिकदृष्ट्या सक्षम असणाऱ्या इच्छुक व्यापारी, संस्था व कंपनी यांचेकडून दरपत्रके मागविण्यात येत आहेत. तरी इच्छुकांनी दरपत्रक सिलबंद लिफाफ्यात विभागीय कार्यालय, कोल्हापूर यांच्या वरील पत्यावरील कार्यालयास किंवा संबधित वखार केंद्रावर ७ दिवसांच्या आत (सुट्टीचे दिवस वगळून) स्पर्धात्मक दरासहीत प्रत्यक्ष पोहोच करावेत.

| अ. क्र. | वखार केंद्राचे नाव | अंदाजित गोदाम उपलब्ध जागा (चौ.फूट) | महामंडळाच्या दरसुचीनुसार दर रु. (प्रति माह, प्रति चौ.फूट) | संपर्कासाठी महामंडळाच्या वखार केंद्राचा संपूर्ण पत्ता व संपर्क क्रमांक |
|---|---|---|---|---|
| १ | फलटण | १०००० चौ. फूट | रु. १२.६० | फलटण-लोणंद रोड, तांबमाळ, फलटण, ता. फलटण, जि.सातारा, पिनकोड नं ४१५५२३ मो.नं ९०९६९७८९७० |
| २ | कराड | २०००० चौ. फूट | रु. १७.४० | म.रा.वखार महामंडळ, कृ.उ.बा.स. मार्केट यार्ड, कराड, ता. कराड , जि. सातारा ४१५११०.मो.नं.९८२३७४१४०७ |
| ३ | धनावडेवाडी | १०५५७० चौ. फूट | रु. १७.४० | सर्व्हे. नं. १२ आणि १४ ए., धनवडेवाडी, करबुडे, निवळी, गणपतीपुळे रोड, जि. रत्नागिरी ४१५६३९. मो.नं. ९४०३३२२९३९, ८९९९८६७४५१ |

- गोदाम भाडे तत्वावर देण्याबाबतच्या अटी व शर्ती महामंडळाच्या www.mswarehousing.com या संकेतस्थळावर पाहता येईल.
- वरील सर्व दरपत्रक कोणतेही कारण न देता, स्वीकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार महाराष्ट्र राज्य वखार महामंडळ यांनी राखून ठेवला आहे.

**विभागीय व्यवस्थापक, मरावम कोल्हापूर**

Scanned with OKEN Scanner

**गोदाम भाड्याने (लॉक अॅण्ड की तत्वावर) देणेबाबतच्या अटी व शर्ती**

१. साठवलेल्या मालाचा विमा साठवणूकदाराने करावयाचा आहे.

२. साठवलेल्या मालाच्या देखभालीचा व मनुष्यबळाचा खर्च साठवणूकदाराने करावयाचा आहे.

३. गोदाम इमारतीचा विमा महाराष्ट्र राज्य वखार महामंडळ यांनी करावयाचा आहे.

४. लॉक-इन कालावधी – ६ महिने (आरक्षण कालावधी २ वर्षे (१+१)).

५. आरक्षण कालावधी पूर्ण झाल्यानंतर कराराचे नूतनीकरण वखार महामंडळ आणि साठवणूकदार यांच्यामधील परस्पर सहमतीने करता येईल.

६.यशस्वी दरपत्रकाला आरक्षण मंजुरी पत्र देण्यात आल्या नंतर त्यांनी त्वरित संमतीपत्र देऊन व सुरक्षा ठेव रक्कमेचा भरणा करुन गोदामाचा ताबा घेण्यात यावा. आणि ताबा पावती संबंधित केंद्र प्रमुखांकडे द्यावी. .

७.ठेवीदाराला लॉक अॅण्ड की भाडेतत्वावर घेतलेल्या गोदामाचा १५ दिवसांत नोंदणीकृत करारनामा करणे बंधनकारक आहे.सदर करारनामा नोंदणीचा व मुद्रांक शुल्काचा व त्या अनुषंगीक इ. बाबींचा सर्व खर्च ठेविदार यांनी करावा. ठेविदार यांना सदरचे आरक्षण वर नमूद अटी व शर्तींच्या आधीन राहून मान्य असल्याबाबतचे Acceptance letter महामंडळास त्वरीत सादर करावे लागेल.

८.करारनाम्यात नमूद दराने प्रत्येक महिन्याला १० तारखेपर्यंत गोदाम भाडे रक्कम महामंडळाच्या खात्यावर RTGS/NEFT द्वारे जमा करणे ठेविदार यांना बंधनकारक राहील.

९.ठेविदार यांनी साठवलेल्या मालाचा विमा उतरावा व सदर विम्याची प्रत केंद्र प्रमुख, वखार केंद्र यांच्याकडे १५ दिवसात सादर करावी.

१०.सदर आरक्षणापोटी ६ महिना कालावधीचे साठवणूक भाडे इतकी रक्कम विनाव्याज सुरक्षा तारण ठेव म्हणून महामंडळाकडे जमा करावी.

११. लॉक-इन कालावधी समाप्त झाल्यानंतर करारनामा रद्द करावयाचा असल्यास ठेविदार कडून ३ महिने आधी नोटीस दिली जाईल किंवा वखार महामंडळास गोदामाची आवश्यकता भासल्यास महामंडळाकडून कंपनीला १ महिना आधी नोटीस दिली जाईल. त्याप्रमाणे कंपनीने सदर गोदामाचा ताबा विना अट महामंडळाकडे परत सुपूर्द करण्यात येईल, याबाबत शपथपत्र द्यावे.

१२.सदर आरक्षित जागेतील साठवणूकी मुळे किंवा इतर कोणत्याही कारणामुळे ठेविदार यांना तोटा झाल्यास त्यास महामंडळ जबाबदार राहणार नाही .

१३.सदर आरक्षित जागेत साठवणूकीमुळे महामंडळाच्या वखार केंद्रावर निर्माण होणाऱ्या कचऱ्याची विल्हेवाट लावण्याची जबाबदारी ठेविदार यांची राहील . तसेच वखार केंद्र परिसरात घाण होणार नाही याची ठेविदार यांनी काळजी घेऊन आवश्यक ती उपाययोजना करावी.

१४.ठेविदार यांना व्यवसायासाठी लागणाऱ्या प्राथमिक तसेच आवश्यक सोयी जसे स्वच्छतागृह, पाणी, वीज, इत्यादी ठेवीदाराने स्वत:च्या खर्चाने उपलब्ध करुन घ्यावयाच्या आहेत.

१५.महामंडळाच्या वखार केंद्रांच्या प्राथमिक बाह्य सुरक्षिततेची जबाबदारी महामंडळाची राहील. तसेच गोदामाच्या अंतर्गत सुरक्षिततेची जबाबदारी ठेविदार यांची राहील.आवश्यकतेनुसार ठेवीदाराने सुरक्षितेच्या दृष्टिने स्व:खर्चाने सीसीटीव्ही कॅमेरा बसवून घ्यावा.

१६.विद्युत पुरवठा तसेच शासकीय परवाने /परवानग्या घेण्याची जबाबदारी ठेविदार यांची राहील. त्यासाठी आवश्यक असणाऱ्या परवानग्या महामंडळाकडून देण्यात येतील एकुण भाडे देयकावर १०% टीडीएस करुन प्रमाणपत्र केंद्रप्रमुख, वखार केंद्र यांचेकडे सादर करावे.

Scanned with OKEN Scanner